# दैनिक दिव्य मराठी प्रकाशन सोहळयानिमित्त भाऊंचे भाषण

*दि. १०-०९-२०११, स्थळ -जे.डी.सी.सी बँक सभागृह, जळगाव*

इथे बरेचसे सकाळ, लोकमत प्रेमी येऊन बसले आहेत. संपादक येऊन बसले आहेत, त्यामुळे भास्करप्रेमी आहेत असे म्हणायला अजून वेळ आहे. मित्रहो, जळगावच्या वैचारिक परंपरेत भर टाकावी अशी एक घटना आज घडते आहे. या तिन्ही वृत्तपत्रांच्या उद्‌घाटनाच्या प्रसंगी मला हजर राहता आलं, आणि आत्तापर्यंत दोघांशीच माझे फार जवळचे संबंध आहेत, आता तिसरा हा जो वृत्तपत्र आहे याच्याशी सुद्धा जवळचा संबंध आहे असं कालपासून वाटायला लागलं. असं का वाटायला लागलं? मी अग्रवाल साहेबांना भेटलो आणि भेटल्या-भेटल्या त्यांनी मला मिठीच मारली. मिठी कशासाठी? नवख्या माणूस पहिल्यांदा भेटला तेव्हा त्याला एकदम आपण मिठी मारत नाहीत. पण त्यांनी जैन हिल्स पाहून आमचं जे शेती संशोधन केंद्र आहे ते त्यांनी पाहिले आणि ते स्वतः एक उद्योगपती आहेत, त्यांचे अनेक कारखाने आहेत, त्याच्यामध्ये सोयाबीन हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे.

पण या वृत्तपत्राच्या माध्यमातून सुद्धा आज त्यांना चारशे-साडेचारशे कोटी रुपयांचे नेट उत्पन्न आहे. म्हणजे पैसे कमविण्यासाठी उलटी कामे केली पाहिजेत तरच पैसे कमविता



F:\Bhashan\Bhashane 4 book\bhashane Book7_91-108

येतात याला छेद घालणारं त्यांचं व्यक्तिमत्त्व आहे. आणि मित्रांनो आणखी एक गोष्ट सांगावीशी वाटते या तिन्ही प्रसंगी मी हजर असल्यामुळे आणि बोललो  एकही मालक किंवा संचालक किंवा तिथला एडिटर असं बोलला नाही की माझं जे काही इन्कम असेल ते जळगावच्या विकासासाठी १० टक्के मी द्यायला तयार आहे. आणि वस्तुतः सगळेच इंडस्ट्रीयॅलिस्ट आहेत, लोकमत सुरु झाला त्यावेळेस इंडस्ट्रीयॅलिस्ट नव्हते, किंवा सकाळ सुरु झाले तेव्हा होते पण या लोकांच्या डोक्यामध्ये हे आलं कसं नाही की जिथे मी जातो आहे, त्याचा विचार मी आधी केला पाहिजे, मग माझा विचार हे लोक करतीलच. आणि मित्रांनो नेमक्या याच तत्त्वांनी मी सुद्धा माझा व्यवसाय केला. कोणतं तत्व? आधी ग्राहकाचा विचार कर मग तुझा विचार तो आपोआप करेल. आणि ग्राहकाला तुम्ही अशा रितीने सेंटरमध्ये ठेवलं आणि त्याच्या अवती-भवती आपला बिझनेस रोवला तर त्याच्यात खूप मोठी प्रगती होण्याची शक्यता निर्माण होते, किंबहुना होतेच.

सामाजिक बांधिलकीचा तो एक भाग म्हणून समजा आपण जर जळगावमध्ये शंभर रुपये उभे करणार असाल तर मी दहा रुपये द्यायला तयार आहे असे अग्रवालजी म्हणालेत. मी माझ्या जगभराच्या उत्पन्नातून ५ टक्के उत्पन्न देण्याचं जगजाहीर केलं आहे आणि कंपनीच्या कॉन्स्टीट्यूशनमध्ये मी तसं लिहून काढलं आहे. म्हणजे मी नसलो तरी ते कायम आहे. त्यांनी जे दहा सांगितले ते जळगावच्या उत्पन्नातून सांगितलं. त्यांनी जर ग्लोबल इन्कमच्या पाच टक्के  सांगितलं असतं तर मी समजलो असतो की, आपलं काम झालं की हजर राहण्याबद्दल आपल्याला काही वेगळी फी आता मागायला नको. मित्रहो ज्या ठिबकने जळगावला जगाच्या नकाशावर पोहोचवलं त्या ठिबकबद्दल गुलाबराव आप्पा एक विशेष बोलून गेलेत. आणि आधीचे फायनान्स मिनिस्टर आणि आत्ताचे इरिगेशन मिनिस्टर आणि स्वतः गुलाबराव दोन्हीजण आज या स्टेजवर उपस्थित आहेत.

त्यांनी म्हटलं की ठिबकचे भाव कमी केले पाहिजेत. आप्पा काय सांगू हो, माझी स्वतःची इच्छा तुमच्यापेक्षा जास्त बलवत्तर आहे की ठिबकचे भाव कमी झाले पाहिजेत. आणि तुम्हाला माहिती आहे, आप्पा आजपर्यंत १७ महिने झाले अजून आमचे पैसे महाराष्ट्र शासनाने दिलेले नाहीत. आकडा सांगतो म्हणजे तुमचा विश्वास बसेल. आपलं जे काही दुखणं आहे ते आप्पांनी मांडलं परंतु ५१२ कोटी केवळ जैन इरिगेशनचे घेणे आहेत. याचा व्याजाचा भूर्दंड कोण भरतो आहे? शेतकरीवर्ग. मी नाही भरत. मी तेवढी



F:\Bhashan\Bhashane 4 book\bhashane Book7_91-108

किंमत वाढवूनच तिथे लावलेली आहे. कारण तुम्ही पैसे देणार नाहीत ही खात्री आहे, त्याच्यामुळे ती वाढवावी लागली. आप्पा अशी काहीतरी स्कीम काढा की ज्याच्यामध्ये आम्हाला वेळेवर माल दिल्यानंतर शेतकऱ्याचं समाधान झालं हे कळल्यानंतर १५ दिवसाच्या आत पैसे मिळतील तर त्याच दिवशी १० टक्के मालाचे भाव कमी करायला तयार आहे.

आपण सौदा करु. आपण सौदा असा करु की तो शेतकऱ्याचा फायद्याचा, माझ्या फायद्याचा नाही. परंतु त्याच्यासाठी आपण आपलं दोघांचं कर्तव्य निभवलं पाहिजे. आप्पा, माझं कामं असं आहे की चांगल्यातला चांगला माल ग्राहकाला उपलब्ध करुन देणं. त्याच्याचबरोबर जागतिक दर्जाचा माल त्याला उपलब्ध करुन देणं, त्याचं उत्पादन कसं वाढेल, याच्याबद्दल सतत सातत्याने काळजी बाळगावी. आणि त्याच्यापुढे ते काम करत रहावं. मी ते अगदी धर्मपूर्वक करत आहे. आणि त्याच्यामुळेच आम्ही जगामध्ये दोन नंबरवर पोहचू शकलो. पण आप्पा, महाराष्ट्र या राष्ट्रातलं फार मोठ्ठ प्रगतिशिल असं राज्य धरलं जातं. मला आपल्याला विचारायचं आहे. आज आपण सगळ्या डिपार्टमेंटकडनं आकडा मागवा की महाराष्ट्रातल्या जनतेची किती रक्कम आपल्याकडे देणे आहे. तुमचे अधिकारी फार हुशार आहेत, ते तोपर्यंत प्रपोजलच घेत नाहीत, जोपर्यंत त्यांच्याकडे पैसे येत नाहीत. (पैसे येत नाहीत मी दुसऱ्या अर्थाने बोलतो आहे.. तुम्ही दुसऱ्या अर्थाने टाळ्या वाजवल्यात मी खऱ्या अर्थाने बोलत होतो) तर मुळात प्रश्न असा आहे की जर आपल्याला एखाद्या उद्योजकाकडनं काही अपेक्षा असतील तर तो व्यापारी आहे हे विसरु नका, तो जिथे काही देईल, तिथे काही मागेल. आणि त्यालाच व्यापार म्हणतात.

आपला हा जो व्यवसाय आहे, त्या व्यवसायामध्ये सुदैवाने म्हणा की दुदैवाने म्हणा. सुदैव कशासाठी ते सांगतो आणि दुर्देव कशासाठी ते सांगतो. सुदैवाने याचं कारण असं आहे की, ही सुरुवात देशामध्ये होण्याच्या आधी महाराष्ट्रामध्ये शरद पवारांनी केली आणि पहिलं ठिबक सिंचनचं अनुदान या महाराष्ट्राला त्यांनी सुरु केलं. आणि आजही महाराष्ट्र हा एक नंबरवर आहे. आणि आपला देश आता ठिबकमुळे जगामध्ये दुसऱ्या नंबरवर जाऊन पोहोचला आहे. इतकं जास्त ठिबक सिंचन आपल्याकडे झालं आहे. कुमार, लोक आता म्हणायला लागलेत की ईश्वराला सुद्धा भाऊंनी हे टेक्नीक पोहचवलं आहे, आणि त्याच्यामुळे तोसुद्धा ठिबक सारखाच पाऊस पाडतो आहे. आणि अतिवृष्टी



F:\Bhashan\Bhashane 4 book\bhashane Book7_91-108

वगैरे जे काही आप्पा म्हणालेत त्याच्यातला तो भाग आहे. मित्रहो, अग्रवाल साहेबांकडे परत येतो, त्यांनी दुसरी गोष्ट सांगितली की हा जो पेपर आहे तो पक्षपाती नसेल. मी गृहित धरतो आहे की, ते जर कोणाची बाजू घेतील तर ग्राहकाची बाजू घेतील, शेतकऱ्यांची बाजू घेतील किंवा जी योग्य आहे ती बाजू घेतील. कोणाची एकाची घेतील असेही नाही पण जे योग्य आहे ती बाजू घेतील. ही अपेक्षा आणि हे आश्वासन सुद्धा त्यांनी दिलं.

शेवटी पेपर हा पेपरच आहे आणि तो व्यवसाय म्हणून अग्रवाल साहेब करत आहेत. ते काही धर्मशाळा म्हणून किंवा धार्मिक उद्योग म्हणून बघत नाहीत, बघूही नये. जिथे-जिथे आपण काहीतरी फुकट केलं जिथे-जिथे अनाठायी आपण केलं तिथे-तिथे समाज त्याची किंमत करत नाही. आज शेतकऱ्यांना वीज मोफत मिळते आहे, शेतकऱ्यांना पाणी जवळपास मोफत मिळतं आहे, त्याची किंमत नाही त्याला. त्याने आणि आपण जर सोडलं तर महाराष्ट्र आणखीन पुढे जाईल याची मी खात्री देतो, उलट होणार नाही. तुम्हाला जी भीती आहे की, आपण जर विजेचे पैसे त्याच्याकडून घेतले तर काय होईल? आता अपोझिशन असताना नाथाभाऊला ते बोलायलाच पाहिजे. की नाही नाही झालचं पाहिजे, शेतकऱ्याला फुकट वीज मिळालीच पाहिजे, परंतु ज्यावेळेला खाजगीमध्ये बोलतो तेव्हा भाऊ शेतकऱ्याला आपण आळशी करतो आहोत. शेतकऱ्याला आपण त्याची जी संस्कृती होती, की सत्य बोलावं, खरं वागावं, परिश्रम करावे याच्यापासून आपण दूर नेतो आहोत, हे खरं नाही का? तर राज्याच्या कृषिमंत्र्यांनी मला हे सांगितले की, भवरलालजी तुम्ही म्हणत आहात मी त्याच्याशी सहमत आहे, परंतु मी भारताचा कृषीमंत्री आहे, महाराष्ट्राचा नाही. म्हणजे यूपी आणि बिहारवाले जोपर्यंत तिथे बसले आहेत, तोपर्यंत ते म्हणतील तेच करावे लागेल ही वस्तूस्थिती असल्यामुळे जरी आमची इच्छा असली तरी आम्ही ते करु शकत नाहीत. हतबद्धता आहे. आणि ती सुद्धा जनतेने लादलेली आहे.

एका कोणत्याही पक्षाला बहुमत नसल्यामुळे दुसऱ्यांचं सगळं ऐकून खरं, खोट जे काही असेल ते करावं लागतं. आता या वृत्तपत्रांनी काय भूमिका घ्यावी हे सांगण्याइतका ज्ञानी, ध्यानी मी आहे, असं मी मानत नाही. कारण तो माझा व्यवसाय नाही. आलो असतो पण अनावधानानं सुटलं. मुळात आपल्याकडनं एक अपेक्षा व्यक्त करतो की ६० टक्के जनता आजही शेतीवर अवलंबून आहे. येनं केनं प्रकारे आजही दुष्काळ पडला



F:\Bhashan\Bhashane 4 book\bhashane Book7_91-108

तर सगळ्या इंडस्ट्रीज अगदी गर्भगळीत होऊन जातात. त्याचं कारण असं आहे की, त्या शेतीच्या कोणत्या मालाशी  तरी त्या इंडस्ट्रीजचा संबंध असतो. तर त्यामुळे सगळ्यांनाच फिकीर असते की शेती चांगली चालावी. मी असा मुद्दा मांडतो की आपल्या पेपरमध्ये ६० टक्के बातम्या आपण शेतकऱ्यांच्या किंवा शेती विषयक देणार आहोत का? त्यांची उत्पादकता आणि उत्पन्न याच्याबद्दल चिंतीत राहून त्याच्याविषयी काही करणार आहोत का? आज आपण फक्त शहरामध्ये आहोत, परंतु जळगाव शहरामध्ये तशी शेती नाही. म्हणजे इथे शेती वेगळ्या प्रकारची होते,परंतु जी शेती खऱ्या अर्थाने केली जाते ती नाही.

राजकारणाची इथे मोठी शेती आहे. याच्यामध्ये काही वादच नाही, परंतु ती ही शेती नाही. तर आपण ज्यावेळेस गामीण भागात जाल, ज्यावेळेस देशाच्या खऱ्या आत्म्याजवळ पोहचाल त्यावेळेला त्यांचे जे प्रश्न आहेत ते ऐरणीवर आणले पाहिजेत आणि त्यातल्या त्यात आज सगळे प्रश्न ऐरणीवर आणले जातात ते केवळ बागायती शेतकऱ्यांचेच असतात. ९० टक्के प्रश्न जे येतात ते बागायती शेतकऱ्यांचे येतात, कोरडवाहू शेतकऱ्यांचे येत नाहीत हा मुद्दा नामदेवरावांनी जो मांडला तो अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. मी जर त्याचं विश्लेषण केलं तर आपल्याला हा मुद्दा किती आवडेल, काय आवडेल माहित नाही, पण मित्रहो, गेली तीन वर्ष झाली याबद्दल मी खूप चिंतीत आहे. की १० टक्के असलेली शेतकऱ्यांची असलेली सुबत्ता १५ टक्के व्यापारी, उद्योजक, राजकारणी यांची असलेली सुबत्ता ही समाजाला घातक आहे, ती समाजाला पुढे नेणारी नाही. आणि म्हणून आपण याच्याबद्दल काहीतरी केलं पाहिजे.

हा मोठा वर्ग जो आहे तो या प्रवाहामध्ये आणता येईल. आपण कोरडवाहू शेतीसाठी पुष्कळ काही करु शकतो. कोरडवाहू शेतीचा एक स्वतंत्र कॉलम असावा किंवा कोरडवाहू शेतकऱ्यांचे जे प्रश्न आहेत, त्याच्याबद्दल आपण विशेष लक्ष द्यावं. आमचे कुमार तर मित्र आहेतच, पण त्यांना शेतीचं फार काही कळतं असं मला वाटलेलं नाही. परंतु मला असं वाटतयं की, एक शेतकरी रिपोर्टर असावा. एखादा चांगला शेतकरी किंवा एखादा खेड्यात जन्माला झालेला आहे, ज्याने खेडे पाहिले आहे, त्याला असं वाटतयं की, आपण आपल्या घरी आलो आहोत आणि त्याला झोपेत जरी विचारलं तरी तो शेतीबद्दल बोलू शकेल. केवळ हुशार माणूस आणून आपण हे प्रश्न सोडवू शकणार नाहीत. एक लहानशी गोष्ट सांगतो, आम्ही सध्या इथे गांधी रिसर्च फाउंडेशन म्हणून

सुरुवात केली आहे, त्याच्याबद्दल इथे जास्त बोलणार नाही, कारण ते सगळं तुम्ही बघणार आहात. त्याच्याबद्दल मी माझ्या एका मित्राला सांगितलं की, तु गांधी रिसर्च फाउंडेशनची धुरा आता सांभाळायला पाहिजे, आता हे खांदे थकून गेले आहेत, ७५ वर्ष पूर्ण होत आहेत, अशावेळेला तुझ्यासारख्या यंग माणसाने यावं आणि हे सर्व सांभाळावं अशी माझी इच्छा आहे, तो आयएएस ऑफिसर राहिलेला मित्र आहे. अत्यंत हुशार आहे आणि बऱ्याच विषयांवर लिहित असतो, त्या मित्राला मी हे सांगत होतो.

तु आता गर्व्हमेंटमधून सुटला आहेस, म्हणजे तुझा आत्मा फ्री झाला असं मी मानतो. त्यावर तो म्हणाला की, भवरलाल, तु सांगशील आणि मी करणार नाही असं कधी होणार नाही, पण यार माझ्या ज्या सवयी आहेत ना, मी गांधीजींबद्दल फार चांगलं काम करू शकतो, चांगलं लिहू शकतो, चांगला अभ्यास करू शकतो, मी बोलू शकतो, सगळं करू शकतो, पण मग दारू सोडावी लागेल एवढंच ना? फार मोठा कठीण प्रश्न आहे का हा? तुला थोडफार नॉनवेज काय चालतं ते सोडावं लागेल एवढंच, नाही नाही ते सोडायची काही गरज आहे असं मला वाटत नाही, पण मी असा राहूनही गांधीजींचं काम करु शकतो असं त्याचं म्हणनं होतं, म्हणून कुमारांनी जर सांगितलं की, मी असा राहूनही शेतकऱ्याबद्दल पुष्कळ लिहू शकतो, तर थोडसं मला पचायला कठीण आहे, तुम्हाला पचेलसुद्धा पण मला पचणं थोडं कठीण आहे. मी खेड्यात जन्माला आलो, तिथे झोपलो, वाढलो, १० वी पर्यंत होतो, आत्ताही तिथला संबंध कायम ठेवतो, अगदी जीवावर येईपर्यंत त्या गावाचा विकास कसा होईल याचा विचार करतो. म्हणून आपल्याला जर शेतीविषयी काही करायचं असेल तर हे करना जरुरी है। केवल पत्रकारही नहीं तो एडीटरभी आपने को खेतीवाला लेना चाहिए। जब ६०८ जनता कृषीसे जुडी हुई है तो हमारे अखबारमें ४०, ५० ८ जनता उससे जुड जाए। तो आप कलकी सोच रहें हो, आजकी नहीं। जब हर एक पेपर खरीदना सुरु करेगा। तो वो सोचिए, उस टाईमका सोच रखीए इसको आजही से शुरुवात कर दिजीए तो हमारे दूसरे मित्र जो यहाँ बैठे हुए है, तो उनको भी यह करना पडेगा। हमारे लोकमतवाले बैठे है, हमारे सकाळवाले बैठे है, सबकाही भला हो गया ऐसा मुझे लगता है। जितने पत्रकार थे उनके पगार डबल हो गये, जितने संपादक थे उनके भी पगार डबल हो गये, और इस विकास की शुरुवात तो हो ही गई, आपने दूसरा मुद्दा उठाया था की, विकास होना चाहिए और जलगाँव का विकास क्यों नहीं होता? ये बहोत बुनियाधी सवाल

आपने खडा किया था और मुझे शरम आयेगी यदी मै उसका जवाब नही देता हूँ। क्योंकी मै जिम्मेदारी लेता हूँ इसकी, जलगाँव का विकास करने में मेरा सहभाग पहले चाहिए और नहीं हो रहा तो क्यों नहीं हो रहा है। अग्रवाल साहब, विकास चार कारणोंसे होता है, एक तो कारण है, की सेंट्रल गर्व्हरमेंट या स्टेट गर्व्हरमेंट अपने कुछ बडे बडे कारखाने यहॉ लगाये और उसके मार्फत उसका स्तर ऊंचा करें।

दुर्भाग्य की बात है, एक ऑर्डनन्स फॅक्टरी छोड दी, बहोत सालों में सेंटर गर्व्हरमेंटका एक भी उद्योग यहाँ नहीं आया, यह तो खैर दुर्भाग्य है, पर विशेष दुर्भाग्य यह है, एक टाईम में हमारे जिल्हेके साडेतीन मिनिस्टर थे अभी तक स्टेट गर्व्हरमेंटकाभी कोई कारखाना यहॉ नहीं आया। एक जब मै बोर्ड के उपर था,जब अंजता फार्म्युसिटीकल नामसें एक छोटासा कारखाना स्टेट गर्व्हमेंटने यहाँ डाला था, उसके बादमें एक भी कारखाना नही। एक तो शासन हमारे लिए नाराज है, क्योंकी हम साफ बोलते है, अग्रवालजी, आपभी साफ बोलते है तो आपके ऊपर भी शासन नाराज हो सकते है। तो मेरा कहने का मतलब यह है की गर्व्हमेंटका जो एक सपोर्ट चाहिए, गर्व्हरमेंटकी एक जो पहल करनी चाहिए वो नही है इसलिए विकास न होनेका यह एक कारण है। दूसरा यह है की खनिज संपत्ती हो, मतलब कुछ भूमी के पेटमें ऐसी चीज हो, जो हम निकाले और पहले तो हम गजागज हो जाए। हम तो धरती के उपर कुछ करना चाहते है, हमें तो मालूम भी नहीं है की, धरती के अंदर क्या है? और इसलिए खनिज संपत्ती न होने के नाते यहाँ कोई बुनियादी कारखाना नही आ पाता।

जैसे के कोई आयमोड मिल जायें, जिससे हम आयाम बना सकें, जिससें हम ॲल्युमिनिअम बना सके, यहाँ पे सोना उगता है, लेकीन उपरसे उगता है, नीचे से सोना मिल जायें निचेसे सोना मिल जायें तो भगवान की बडी मेहरबानी होगी और उसमें वो विकास जल्दी से हो जायेगा। तिसरी बात है, यहाँ के लोग कितना भी इन्कार करना चाये क्या लोंग खराब है और इसके लिए विकास को मानते नहीं, आलसी है, कुछ काम करते नहीं, मैं आपको कह दू की ऐसा कुछ भी नहीं है, यदी इस शहर के या इस जिल्हे के, लोग आलशी हैं, तो आलस की परिभाषा अपने को बदलनी पडेगी। वो आलसी नहीं है बहोत एंटरप्राईजिंग है, परत मराठीवर येतो, प्रत्येक क्षेत्रामध्ये एवढे इंटरप्राईजिंग लोक असताना मग शैक्षणिक क्षेत्रातले असू द्या, इंडस्ट्रीमधले किंवा एनएमयू असू द्या, जिथे जिथे ते गेलेत दोन-तीन-चार-पाच का असेना तिथे नंबर एक घेण्याचा

त्यांनी प्रयत्न केला. देशात नंबर एक घेतले, राज्यात नंबर एक घेतले, आणि जगामध्ये नंबर एक घेण्याच्या स्टेजवर आज ते आहेत. इथे उद्योजकता कमी आहे किंवा पॉप्युलेशन कमी आहे, अशातला काही भाग नाही, किंवा इथले लोक आळशी आहेत, मुळीच नाहीत. इथले लोक चांगले आहेत, पण या चांगल्या लोकांना आज समाजामध्ये फार कमी किंमत आहे.

ज्यांच्याजवळ पैसा आहे, त्याला ती किंमत आहे, आणि पैशाची किंमत असताना जर पैसेवाल्याने पैसा योग्य तऱ्हेने लावला नाही तर मग पंचायत निर्माण होते, ती पंचायत थोडीशी आमच्याकडे निर्माण झालेली आहे, जास्त नाही म्हणणार, कारण कारखानदारीला आपल्याला जे वातावरण पोषक लागतं ते वातावरण इथे अजून पोषक असे निर्माण झालेले नाही. तर हे वातावरण जर पोषक झालं तर फार उत्तम होईल. गेली ३५ वर्षे मी बघतो आहे, परंतु काही ना काही कारणांमुळे विविध पक्षांमध्ये दुमत निर्माण झाल्यामुळे आपल्या जिल्ह्याचा विकास कमी झाला, व्हावा तसा झाला नाही, व्हायला पाहिजे तसाही झालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. आणि म्हणून आप्पा या वातावरणात जर काही बदल होऊ शकला तर ते फार महत्त्वाचं ठरेल.

पक्ष तुम्ही तुमच्या ठिकाणी ठेवा, तुम्ही जरूर भांडत रहा, विधानसभेच्या फ्लोअरवर भांडत रहा, ज्यावेळेला जळगावच्या भूमीवर तुम्ही पाय ठेवतात त्यावेळेला तुम्ही केवळ जळगावचे आहात, दुसरे कोणाचे नाही आहेत, हे लक्षात घ्या. आणि हे जर आपण लक्षात घेतलं, तर मला असं वाटतं की आपण खूप काही साधू शकतो, आज आपल्याला तशी परिस्थिती निर्माण झालेली नाही, तर ती होऊ शकली तर फार चांगलं होईल असं मला वाटतं, चौथा सवाल जो आता है अग्रवाल साहब, मेरे दिल मे जो है वो मैं आपको बताऊ की मैने एक बार तय किया की जलगाँव को शिक्षण केंद्र बनाना हे, और ऐसा करेंगे, राजस्थानमें कोटा करके गाँव है, वहाँ सबके सब क्लासेस है और उसके ऊपर खूप धनवान बन गयी है नगरी। तो मैने भी सोचा की शिक्षण जैसी पवित्र बात आ जाती है तो, कोई तकलीफ की बात नहीं आपन शिक्षानगरी बनायेंगे। अब देख रहा हूँ, धीरे-धीरे सपनेको रूप आ रहा है और कॉलेज के पीछे कॉलेज ऐसे निर्माण हो रहें है, और उसमें बच्चे आ रहें हे, बच्च०ी आ रही है, बिहारसे आ रहीं है, यूपीसे आ रही है, महाराष्ट्र से आ रही है, सब जगह से बच्चे-बच्ची आ रहीं है और गए तीन सालमें देख रहा हूँ, की ॲक्सीडंटका प्रमाण बढ गया है,। बच्चे और बच्चीया बिल्कुल

सेंटर ऑफ दी रोडमें खडे रहते है और वहाँ खडे रहकर गपशप लगाते, उसका कोई हिसाब नही, यदी हम हमारी संस्कृती खो देंगे, और संपत्तीको अपना लेंगे, तो हमारी संस्कृती के बिना हमारी संपत्ती का क्या होगा? वो भी तो झिरो हो जायेंगी, परंतु दुर्भाग्य है की आज यह हर एक जगह हो रहा है। अभी केतकर साहब कह रहे थे, की बम्बई बहोत बडी लगती है, पर हमको ऐसा लगता है, किसको पहचान है बम्बई की? कोई एक आदमी यह नहीं देखता की मै बम्बई का हूँ, और उसकी छाती तीन इंच फुग जाती, ऐसा नहीं होता। ऐसा कोई आदमी है ही नहीं की जिसको लगता की बम्बई मेरी है, तो हमारे जलगाँव का भी यही होनेवाला है, की हमारी नगरी की पहचानही हम भुल जायेंगे। तो ऐसे विकास को लेकर हम करेंगे भी क्या? विकास इतनाही हो जो हम पेल सके। हमारी संस्कृतीसे कॉम्प्रोमाईज करना पडे ऐसा नहीं हो, उसके साथ साथ में हम करे, ऐसी मेरी खुदकी इच्छा है और इसके लिए बहोत ज्यादा नहीं हो रहा है, उसका कारण दिया, आप खुद उसमें शामिल होना चाहते है, उस प्रभाव में शामिल होना चाहते है, समाज के बाबत आपने जो यहा बात रखी, मै जानता हुँ, आप जो बोल रहे है, ॲट व सर्टन लेव्हल यू आर स्पीकींग दॅट सेयींग, ॲण्ड दॅट अमाऊंट टू अ कमिटमेंट ॲण्ड यू डेफिनेटली किप इट अप, आजतक तो हमने वृत्तपत्रोका जो रुप देखा है वो थोडासा अलग है, वो ऐसा है की, उनको उनके हिसाब से जितना बैठता है, उतना करते है और उनको यदि आप कहें की भाई आप कुछ पैसा खर्चा करके समाज के लिए कुछ करो, तो फिर वो किसी ना किसी को ढुंढके लायेंगें और उसके मार्फत और साथमें लेकर करेंगे। आप यदि खूद करनेवाले है, तो बडी आनंद की बात है, मै आपको धन्यवाद देता हूँ की, आपने सब कहाँ और सुना, मुझको बोलणेमे ज्यादा स्पष्टता आ गई हो, समय लग गया हो तो माफ करें,

जयहिंद जय महाराष्ट्र..!



F:\Bhashan\Bhashane 4 book\bhashane Book7_91-108